# दि सी.के.पी.को-ऑपरेटिव्ह बॅंक लि.

## सभासद, ठेवीदार यांस आवाहन......

नुकत्याच पार पडलेल्या बॅंकेच्या ९९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत आम्हा संचालकांवर आपण दाखविलेला विश्वास व सभेत राखलेला संयम बॅंकेची धुरा वाहताना आम्हाला दुप्पट बळ देऊन गेला व त्याचबरोबर बॅंक सुस्थितीत आणण्यासाठी आम्हाला लागणारा आत्मविश्वास ही वाढला. आम्ही सादर केलेल्या पुनरूज्जीवन योजने मधून बॅंक पुन्हा आपल्या सेवेत सर्वसंपन्नतेने रूजू होऊ शकते याबाबत आपणही आश्वासित झालात, आणि म्हणूनच आम्हा संचालकांनी प्रस्तावित केलेल्या बॅंकेच्या भाग भांडवल वाढीच्या प्रस्तावाला आपण सर्वांनी सभेत एकमुखाने संमती दिलीत.

### आपण हे कशासाठी करत आहोत ?

कारण गेल्या काही वर्षांपासून अनेक कारणांमुळे बॅंकेची आर्थिक परिस्थिती अत्यंत खालावली असून आजघडीला बॅंकेचे नक्त मूल्य रू.-१३२.२८ कोटी (-२४.२५%) अशा धोक्याच्या पातळीवर आहे. अशा परिस्थितीत बॅंकेचे विलिनीकरणात आपल्या ठेवींचा परतावा घटून फक्त ६0% मिळू शकेल अथवा बॅंक अवसयानात आपले घटलेलेही पैसे मिळण्यासाठी अमर्यादित काळ वाट पहाणे एवढेच आपल्या हाती राहील.

आम्ही केवळ ४-५ महिन्यांपुर्वी बॅंकेचा कार्यभार हाती घेतल्यावर वरील चित्र पाहील्यानंतर सर्वप्रथम कर्ज वसूलीवर लक्ष केंद्रित केले. कार्यभार हाती आल्यापासूनच्या अल्पकाळात रू.४३.00 कोटींची कर्ज वसुली केली. मार्च २०१६ पर्यंत रू.७0.00 कोटीं वसुली करण्याचे आमचे उद्दिष्ट आहे.

आपल्या बॅंकेची आर्थिक घसरण थोपविण्याच्या दृष्टीने, ठेवींवर बॅंकेने अदा केलेले परंतू ठेवीदारांना काढता न आलेली व्याजाची रक्कम रू.५२.४५ कोटी बॅंकेकडे जमा आहे. ही रक्कम बॅंकेच्या भागभांडवलात रूपांतरीत झाल्यास बॅंकेचे नक्त मुल्य सुदृढ होऊन ठेवीच्या परतावा किंमतीत वाढ होईल. आपल्या ठेवी सुरक्षित करण्याचा आपल्या हाती असणारा हा राजमार्ग आहे आणि म्हणूनच ही जमा व्याजाची रक्कम बॅंकेच्या भागभांडवलामध्ये गुंतवणूक करण्यास आपण ठेवीदारांनी अनुमती द्यावी.

### यासाठी आता आपण एवढेच करायचे...

आपण सहकार्यासाठी पुढे केलेल्या हाताने आपल्या बॅंकेच्या शाखांमध्ये उपलब्ध असलेला किंवा बॅंकेच्या वेब साईट वर असलेला अर्ज डाऊनलोड करून आपल्या जवळच्या शाखेत भरून द्यायचा बस्. बॅंकेचे भाग भांडवल वाढविण्यासाठीचा हा अर्ज रिजर्व्ह बॅंके कडे मान्यतेसाठी पाठवायचा असल्यामुळे तो लवकरात लवकर भरून द्यावा.

**आपल्या या सहकार्यानेच आपली बॅंक फिनिक्स पक्षाप्रमाणे भरारी घेणार आहे...**
**तुमचे आमचे सर्वांचेच भाग भांडवल व ठेवी सुरक्षित करण्यासाठी.**

आपल्या सहकार्याच्या अपेक्षेत...

संचालक मंडळ